**जिल्हा परिषद कोल्हापूर,**
**नाविन्यपूर्ण उपक्रमांतर्गत**
***"दिव्यांग उन्नती अभियान"***
**अंमलबजावणी करणेबाबत.**

**कोल्हापूर जिल्हा परिषद, कोल्हापूर**
**समाजकल्याण विभाग,**
**परिपत्रक क्रमांक : दि.उ.अ./कावि/2018**
**दिनांक : 26 जून 2018.**

**संदर्भ :** १) महाराष्ट्र शासन, ग्राम विकास विभाग, शासन निर्णय क्रमांकः व्हीपीएम 2013/प्र.क्र.158/पंरा-3 दिनांक २४ सप्टेंबर, २०१३

२) महाराष्ट्र शासन ग्रामविकास विभाग, शासन निर्णय क्रमांक संकीर्ण २००७/प्र.क्र.४८७१/वित्त३, मुंबई, दिनांक २५ जून २०१४.

३) महाराष्ट्र शासन ग्रामविकास विभाग, शासन निर्णय क्रमांक अपंग २०१५/प्र.क्र.१३७/वित्त३, मुंबई दिनांक २४ नोव्हेंबर २०१५.

४) महाराष्ट्र शासन ग्रामविकास विभाग, शासन निर्णय क्रमांक व्हीआयपी-२०१६/प्र.क्र.२४/वित्त३, मुंबई, दिनांक २८ एप्रिल २०१६.

५) महाराष्ट्र शासन ग्रामविकास विभाग, शासन निर्णय क्रमांक अपंग-२०१६/प्र.क्र.२४/वित्त३, मुंबई, दिनांक २१ सप्टेंबर २०१६.

**१. प्रस्तावना :**

राजर्षि छत्रपती शाहू महाराजांनी समाजातील वंचित घटकासाठी खूप मोठे काम केले आहे. नैसर्गिकरित्या किंवा अपघाताने अपंगत्व आलेल्या समाजातील दिव्यांग व्यक्तीना त्यांचे हक्क प्राप्त करून देणे आणि त्यांच्यासाठी जाहिर केलेल्या योजनांचा त्यांना पूर्ण लाभ मिळवून देणे यासाठी शासन नेहमी आग्रही असते. या गोष्टीसाठी जाणीवपूर्वक प्रयत्नांची आवश्यकता आहे.

संदर्भीय शासन निर्णय क्र. १ नुसार सर्व ग्रामपंचायातीनी दिव्यांग लाभार्थींची नोंदवही ठेवणे आणि सदर नोंदवही प्रत्येक वर्षी अद्यावत करणे बंधनकारक करण्यात आले आहे. तसेच स्वनिधीमधून दिव्यांग लाभार्थ्यांना लाभ देण्यासाठी ३% निधीची तरतूद करणेही बंधनकारक करण्यात आले आहे.

संदर्भीय शासन निर्णय क्र. २ नुसार जिल्हा परिषद, पंचायत समिती आणि ग्रामपंचायतीनी त्यांच्या स्वनिधी मधून वैयक्तिक लाभाच्या योजना राबविताना एकूण लाभार्थ्यापैकी ३% लाभार्थी अपंग प्रवर्गातील असणे आवश्यक आहे. सदरची तरतूद सन २०११-१२ पासून करावयाची आहे.

संदर्भीय शासन निर्णय क्र. ३ नुसार जिल्हा परिषद, पंचायत समिती आणि ग्रामपंचायतीनी त्यांच्या स्वनिधी मधून दिव्यांग लाभार्थ्यांना वैयक्तिक अथवा सामुदायिक स्वरूपाचे कोणकोणते लाभ देता येतील याबाबत सविस्तर मार्गदर्शन करण्यात आले आहे.

संदर्भीय शासन निर्णय क्र. ४ नुसार दिव्यांग लाभार्थ्यांना लाभ देताना त्यासाठीचे अनुदान लाभार्थ्यांचे खात्यावर थेट जमा करावयाचे असून त्याची पद्धती सविस्तरपणे विषद करण्यात आली आहे.

संदर्भीय शासन निर्णय क्र. ५ नुसार दिव्यांग लाभार्थ्यांना लाभ देण्यासाठी स्वतंत्र अपंग कल्याण निधीची स्थापना करून २५% निधी वैयक्तिक लाभासाठी आणि ७५% निधी भांडवली कामासाठी खर्च करावयाचा आहे. त्याबाबतचे सविस्तर मार्गदर्शन सदर शासन निर्णयात करण्यात आले आहे.

दिव्यांग व्यक्तींसाठी विविध शासकीय योजनांचा लाभ मिळवून देवून त्यांचे जीवनमान उंचावणेसाठी जिल्हा परिषद कोल्हापूर मार्फत नाविन्यपूर्ण उपक्रमांतर्गत ***"दिव्यांग उन्नती अभियान "*** राबविण्याचे निश्चित झाले आहे. सदर अभियानाच्या यशस्वी अंमलबजावणीसाठी मार्गदर्शक सूचना निर्गमित करणे आवश्यक आहे.

**२. " दिव्यांग उन्नती अभियानाचा " उद्देश :**

या अभियानांतर्गत जिल्ह्यातील सर्व दिव्यांगांची नोंदणी करणे, त्यांची तपासणी करून त्यांना अपंगत्वाचे प्रमाणपत्र उपलब्ध करून देणे, विविध शासकीय योजनांचा लाभ देऊन त्यांचे जीवनमान उंचावणे आणि आरोग्य विषयक संदर्भ सेवा उपलब्ध करून देऊन अपंगत्वावर मात करण्याचा प्रयत्न करणे हा या अभियानाचा मुख्य उद्देश आहे.

**३. " दिव्यांग उन्नती अभियानाची " उद्दिष्टे :**

सदर अभियानाची अंमलबजावणी करत असताना पुढीलप्रमाणे प्रमुख उद्दिष्टे निश्चित करण्यात आली आहेत.

१) जिल्ह्यातील सर्व दिव्यांग व्यक्तींची नोंदणी १००% करून ती संकेतस्थळावर online उपलब्ध करणे

२) अपंगत्व प्रमाणपत्र नसलेल्या लाभार्थ्यांची तपासणी करून त्यांना अपंगत्व प्रमाणपत्र देणे.

३) तपासणी पश्चात पुढील उपचारांची आवश्यकता असलेल्या दिव्यांगाना संदर्भ सेवा देऊन शासनाच्या विविध योजनाद्वारे उपचाराच्या सुविधा उपलब्ध करून देणे.

४) दिव्यांगांसाठी उपकरणे आवश्यक असल्यास उपलब्ध करून देणे. (उदा.३% अपंग निधी, इतर शासकीय योजना, स्वयंसेवी संस्था, CSR इ.)

५) प्रमाणपत्र प्राप्त लाभार्थ्यांना शासकीय योजनांचे लाभ देण्यासाठी मेळाव्यांचे आयोजन करणे. (उदा.3% खर्च योजना, विमा योजनेचा लाभ मिळवून देणे, पेन्शन योजना, एसटी/रेल्वे पास, इतर शासकीय लाभ इ.)

6) सर्व पात्र दिव्यांग लाभार्थींना ' स्वावलंबन कार्ड ' उपलब्ध् करुन देणे.

**४. अभियान अंमलबजावणीसाठी जिल्हास्तरीय समिती**

या अभियानाच्या यशस्वी अंमलबजावणीसाठी जिल्हास्तरीय सनियंत्रण समितीचे गठन करण्यात आले असून सदरची समिती पुढीलप्रमाणे राहील.

| | |
|---|---|
| १) अध्यक्ष, जिल्हा परीषद | अध्यक्ष |
| २) उपाध्यक्ष व जि.प.समिती सभापती | सदस्य |
| ३) मुख्य कार्यकारी अधिकारी | सदस्य |
| ४) अधिष्ठाता, शासकिय वैद्यकीय महाविद्यालय | सदस्य |
| ५) जिल्हा शल्य चिकित्सक | सदस्य |
| ६) जिल्हा आरोग्य अधिकारी | सदस्य |
| ७) सहा.आयुक्त, समाज कल्याण | सदस्य |
| ८) तहसीलदार (सं.गां.यो.) | सदस्य |
| ९) व्यवस्थापक, जिल्हा उद्योग केंद्र | सदस्य |
| १०) व्यवस्थापक, जिल्हा अग्रणी बँक | सदस्य |
| ११) आगार प्रमुख, एसटी महामंडळ | सदस्य |
| १२) जिल्हा समन्वयक (म.फुले जीवनदायी आरोग्य योजना) | सदस्य |
| १३) दिव्यांग संघटना प्रतिनिधी २ | सदस्य |
| १४) उपमुख्य कार्यकारी अधिकारी (ग्रा.पं.) | सदस्य |
| **१५) जिल्हा समाज कल्याण अधिकारी** | **सदस्य सचिव** |
| १६) उपमुख्य कार्यकारी अधिकारी (सा.प्र.) | समन्वयक |

जिल्हा सनियंत्रण समितीने सदर अभियानाच्या प्रभावी अंमलबजावणीसाठी आढावा बैठक घेऊन आवश्यक कार्यवाही करावी.

**५. अभियान अंमलबजावणीसाठी कालबद्ध नियोजन व करावयाची कार्यवाही.**

सदर अभियानाची अंमलबजावणी एकूण ४ टप्प्यामध्ये केली जाणार आहे.

**टप्पा क्रमांक १ :** जिल्ह्यातील सर्व दिव्यांग व्यक्तींची नोंदणी १००% करून ती संकेतस्थळावर online उपलब्ध करणे.

**टप्पा क्रमांक २ :** अपंगत्व प्रमाणपत्र नसलेल्या लाभार्थ्यांची तपासणी करून त्यांना अपंगत्व प्रमाणपत्र देणे.

**टप्पा क्रमांक ३ :** दिव्यांग उपकरणे उपलब्ध् करुन देणेसाठी तपासणी कँप घेणे.

**टप्पा क्रमांक ४ :** आरोग्य तपासणी करुन संदर्भ सेवा, उपचार करणे, स्वावलंबन कार्ड देणे आणि शासकीय योजनाचे मेळावे घेणे, 3% खर्चातून योजना राबविणे.

**टप्पा क्रमांक १** :- **जिल्ह्यातील सर्व दिव्यांग व्यक्तींची नोंदणी १००% करून ती संकेतस्थळावर online उपलब्ध करणे.**

| अ.क्र. | बाब/मुद्दा | करावयाची कार्यवाही. | कालमर्यादा/ दिनांक | जबाबदारी |
|---|---|---|---|---|
| १ | जिल्हास्तरीय कार्यशाळा | सदर कार्यशाळेत सर्व पदाधिकारी, समाजकल्याण समिती सदस्य, सर्व खातेप्रमुख, गटविकास अधिकारी, तालुका आरोग्य अधिकारी, बालविकास प्रकल्प अधिकारी, विस्तार अधिकारी (पं), विस्तार अधिकारी (आरोग्य), Block Manager (ASSK) यांना आमंत्रित करून अभियानाच्या अंमलबजावणीबाबत सूचना देण्यात याव्यात. | दि. 30/06/2018 | उपमुख्य कार्यकारी अधिकारी (सा.प्र) समाजकल्याण अधिकारी |
| २ | तालुकास्तरीय कार्यशाळा | सदर कार्यशाळेस तालुक्यातील जिल्हा परिषद पदाधिकारी, पंचायत समिती सभापती, जिल्हा परिषद व पंचायत समिती सदस्य, तालुकास्तरीय सर्व विभाग प्रमुख, ग्रामविकास अधिकारी, ग्रामसेवक, अंगणवाडी पर्यवेक्षिका, प्राथमिक आरोग्य केंद्राकडील आरोग्य सहाय्यक, आशा गट प्रवर्तक, आशा तालुका समूह संघटक यांना आमंत्रित करून अभियानाच्या अंमलबजावणीबाबत परिपत्रक वाचून सूचना देण्यात याव्यात व समन्वयाची जबाबदारी प्रभाग सचिव यांचेवर सोपवावी. | दि. 02/07/2018 किंवा दि. 03/07/2018 | गटविकास अधिकारी, विस्तार अधिकारी (पं) विस्तार अधिकारी (आरोग्य) |
| ३ | ग्रामपंचायत स्तरावर कार्यशाळा. | १. ग्रामविकास अधिकारी / ग्रामसेवक यांनी ग्रा.प. स्तरावरील कार्यशाळेची वेळ निश्चित करून सर्वांना कळवावे.<br>२. या कार्यशाळेसाठी गावातील जिल्हा परिषद आणि पंचायत समिती सदस्य, ग्रामपंचायतीचे पदाधिकारी आणि सदस्य, गावातील इतर सन्माननीय व्यक्ती, दिव्यांग लाभार्थी, आरोग्य कर्मचारी, आशा आणि अंगणवाडी सेविकांना निमंत्रित करावे.<br>३. कार्यशाळेच्या सुरुवातीस उपस्थिताना सदर मोहिमेचा उद्देश आणि त्याबाबत करण्यात येणारी कार्यवाही याबाबत अवगत करावे. त्यासाठी या परिपत्रकाचे वाचन करावे.<br>४. त्यानंतर दिव्यांग नोंदणीचा फॉर्म कसा भरावा याबाबत आशा आणि अंगणवाडी सेविकांना मार्गदर्शन करावे. सदर नोंदणी हि आशा आणि अंगणवाडी सेविका यांनी गृहभेटी देऊन करणेची आहे. | दि. 05/07/2018 किंवा दि. 06/07/2018 | ग्रामविकास अधिकारी/ ग्रामसेवक/ आरोग्य सेवक/ सेविका, प्रभाग सचिव |

| | | | | |
|---|---|---|---|---|
| | | ५. नोंदणी केलेल्या दिव्यांगांची online नोंदणी कशी करण्यात येणार आहे याबाबत ग्रामपंचायतीकडील ASSK केंद्रचालक यांनी २ फॉर्म online भरून उपस्थिताना दाखवावेत. सर्व्हे फॉर्म मधील मुददा क्र.14 अपंगत्वाचा प्रकार ओळखणेसाठी परिशिष्ठ "ब" मधील मार्गदर्शक सूचनांचे वाचन करावे.<br>६. गावातील दिव्यांग व्यक्तींची संख्या लक्षात घेवून ग्रामपंचायतीने परीपत्रका सोबत जोडलेल्या नोंदणी फॉर्मच्या (परिशिष्ठ अ) पुरेश्या प्रती तयार ठेवाव्यात.<br>७. आशा आणि अंगणवाडी सेविकांमध्ये त्यांच्या कार्यक्षेत्रानुसार पुरेश्या फॉर्मचे वाटप करावे. गावातील कोणताही दिव्यांग लाभार्थी नोंदणीपासून वंचित राहणार नाही याची दक्षता घेऊन नियोजन करावे.<br>८. नोंदणी मोहिमे अगोदर एक दिवस या मोहिमेची दवंडी/स्पिकर/नोटीस बोर्डद्वारे व्यापक प्रसिद्धी करावी.<br>९. यावेळी नोंदणीसाठी आशा आणि अंगणवाडी सेविका आपल्या घरी येणार असून नोंदणीवेळी दिव्यांग व्यक्तीचा एक फोटो आणि त्याच्याकडे उपलब्ध असल्यास अपंग दाखल्याची एक झेरॉक्स प्रत नोंदणी करणाऱ्या व्यक्तीकडे देण्याविषयी सूचित करावे.<br>१०. तसेच लाभार्थ्यास ग्रामपंचायती मध्ये येवून नोंदणी करावयाची असल्यास तेथेही ASSK केंद्रचालक यांच्या मार्फत सुविधा उपलब्ध करून द्यावी. | | |
| ४ | प्रत्यक्ष सर्व्हेचा दिवस दिव्यांग व्यक्तींचे फॉर्म भरणे/ नोंदणी करणे. | १. नोंदणी मोहिमेचा शुभारंभ गावातील जिल्हा परिषद आणि पंचायत समिती सदस्य, ग्रामपंचायतीचे पदाधिकारी आणि सदस्य, गावातील इतर सन्माननीय व्यक्ती यांच्या हस्ते करावा. सर्व पदाधिकारी, अधिकारी यांनी प्रातिनिधीक स्वरुपात दिव्यांग लाभार्थीच्या घरी जावून गृहभेटीव्दारे सर्व्हेक्षणाचा फॉर्म भरावा.<br>२. नोंदणी मोहीम एक दिवसीय असून त्या दिवशीच शक्यतो १००% नोंदणी करणे आवश्यक आहे. काही कारणास्तव लाभार्थ्यांची नोंदणी न होऊ शकलेस ग्रा.पं.मध्ये अर्ज उपलब्ध ठेवून नोंदणी करावी.<br>३. मोहीम संपल्यानंतर नोंदणी करणाऱ्या कर्मचारी यांनी सर्व फॉर्म ग्रामपंचायतीकडे जमा करावयाचे आहेत. सर्व फॉर्म व्यवस्थित भरल्याची आणि १००% नोंदणी पूर्ण झाल्याची खात्री संपर्क अधिकारी आणि | दि. 07/07/2018 | ग्रामसेवक/ ग्रामविकास अधिकारी, आशा/ अंगणवाडी सेविका |

| | | | | |
|---|---|---|---|---|
| | | ग्रामसेवक/ग्रामविकास अधिकारी/आरोग्य सेवक/आरोग्य सेविका यांनी करावी.<br>४. नोंदणी करण्यासाठी प्रती लाभार्थी किमान रु. २५/- इतके मानधन फक्त गृहभेटीद्वारे नोंदणी कर्मचार्यांना ग्रामपंचायतीने अदा करावे. | | |
| ५ | भरलेले फॉर्म online करणे. | नोंदणी करण्यात आलेले सर्व फॉर्म जिल्हा परिषदेच्या वेबसाईटवर उपलब्ध संगणक प्रणालीवर online नोंद करणे गरजेचे असून ग्रामपंचायतीकडील ASSK केंद्रचालक यांनी दिलेल्या मुदतीत सदरचे काम पूर्ण करावे. प्रभाग सचिव यांनी या कामाचा पाठपुरावा करावा. | दि. 08/07/2018 ते 15/07/2018 | ग्रामविकास अधिकारी/ ग्रामसेवक, ASSK केंद्रचालक, प्रभाग सचिव. |

1) **दिव्यांग सर्व्हेक्षणासाठी आवश्यक सॉफटवेअर वेबसाईट उपलब्ध करुन देणेबाबत उप मुख्य कार्यकारी अधिकारी (सा.प्र) यांनी कार्यवाही करावी.**
2) **ग्रा.पं. स्तरावरील सर्वेक्षणाचे नियंत्रण व अंमलबजावणी उप मुख्य कार्यकारी अधिकारी (ग्रा.पं.) यांनी करावी.**

**टप्पा क्रमांक २ :- अपंगत्व प्रमाणपत्र नसलेल्या लाभार्थ्यांची *तपासणी करुन त्यांना अपंगत्व प्रमाणपत्र देणे.***

| अ.क्र. | बाब/मुद्दा | करावयाची कार्यवाही. | कालमर्यादा/ दिनांक | जबाबदारी |
|---|---|---|---|---|
| १ | संनियंत्रण समिती बैठक | १. समिती सदस्यांना नोंदणी अहवालाबाबत अवगत करणे.<br>२. पुढील कार्यक्रमाचे नियोजन करणे. | दि. 21/07/2018 | उपमुख्य कार्यकारी अधिकारी (साप्र) समाजकल्याण अधिकारी |
| २ | तपासणी शिबिरांचे आयोजन | १. तालुकानिहाय अपंगत्व प्रमाणपत्र नसलेल्या लाभार्थ्यांच्या संख्येनुसार तपासणी शिबिराच्या तारखा निश्चित करणे.<br>२. सदर लाभार्थ्यांना तपासणीसाठी तालुकास्तरावर कॅप लावणे किंवा सीपीआर कोल्हापूर येथे तपासणी करण्यासाठी आणण्याचे नियोजन करणे.<br>३. मिळालेल्या प्रमाणपत्रांचे मान्यवरांच्या हस्ते वाटप करणे. | माहे ऑगस्ट, सप्टेंबर, ऑक्टोंबर, नोव्हेंबर 2018 | समाजकल्याण अधिकारी गटविकास अधिकारी, तालुका आरोग्य अधिकारी, विस्तार अधिकारी (पं), विस्तार अधिकारी (आरोग्य) |

**टप्पा क्रमांक ३ :- दिव्यांगाना उपकरणे उपलब्ध करुन देणेसाठी कँपचे आयोजन करणे.**

| अ.क्र. | बाब/मुद्दा | करावयाची कार्यवाही. | कालमर्यादा/ दिनांक | जबाबदारी |
|---|---|---|---|---|
| १ | तालुका स्तरावर तपासणी शिबिरांचे आयोजन करुन दिव्यांगांसाठी साहित्य उपलब्ध् करणे | दिव्यांग व्यक्तींना लागणाऱ्या दिव्यांग साहित्यासाठी तालुका स्तरावर ग्रामीण रुग्णालय/उपजिल्हा रुग्णालय/प्राथमिक आरोग्य केंद्र येथे तपासणी शिबिरांचे आयोजन करणे. संदर्भ सेवा आवश्यक असलेल्या दिव्यांगाना पुढील उपचाराबाबत मार्गदर्शन करून नियोजन करणे. तसेच तपासणी पश्चात दिव्यांग व्यक्तींना लागणाऱ्या दिव्यांग साहित्य उपलब्ध करुन देणेसाठी ALIMCO सारख्या कंपनीचे कॅम्प आयोजीत करणे. | सप्टेंबर / ऑक्टोंबर 2018 | जिल्हा समाजकल्याण अधिकारी, जिल्हा आरोग्य अधिकारी, गटविकास अधिकारी, अधीक्षक (ग्रामीण रुग्णालय) तालुका आरोग्य अधिकारी, विस्तार अधिकारी (पं), विस्तार अधिकारी (आरोग्य) |

**टप्पा क्रमांक ४ :- संदर्भ सेवा, उपचार, साहित्य वाटप आणि शासकीय योजनाचे मेळावे घेणे.**

| अ. क्र. | बाब/मुद्दा | करावयाची कार्यवाही. | कालमर्यादा/ दिनांक | जबाबदारी |
|---|---|---|---|---|
| १ | दिव्यांगाना उपचार/ संदर्भ सेवा उपलब्ध करून देणे | वैयक्तीक तपासणी अंती ज्या दिव्यांग व्यक्तींना पुढील उपचाराची आवश्यकता आहे त्यांना शस्त्रक्रिये सारख्या पुढील उपचारासाठी संदर्भीय सेवा पुरविणे आणि शासनाच्या विविध योजनांतर्गत सदर लाभार्थ्यांना मोफत उपचाराच्या सुविधा उपलब्ध करून देणे. | सप्टेंबर, ऑक्टोंबर, नोव्हेंबर 2018 | जिल्हा समाजकल्याण अधिकारी, जिल्हा आरोग्य अधिकारी, गटविकास अधिकारी,अधीक्षक (ग्रामीण रुग्णालय) तालुका आरोग्य अधिकारी, विस्तार अधिकारी (पं), विस्तार अधिकारी (आरोग्य), आरोग्य सेवक/सेविका |
| २ | जिल्हा परिषद, पंचायत समिती व ग्रामपंचायत स्वनिधीमधून ३% खर्चाचे नियोजन | जिल्हा परिषद, पंचायत समिती व ग्रामपंचायत स्तरावरील ३% निधीमधून दिव्यांगाना लाभ देणेबाबत नियोजन करणे. दि. २ ऑक्टोबर च्या ग्रामसभेत लाभार्थी निश्चिती करून योजना अंतिम करणे व याची अंमलबजावणी करणे. | नोव्हेंबर, डिसेंबर 2018 | समाज कल्याण अधिकारी, गटविकास अधिकारी, ग्राविअ/ग्रासे |

| | | | | |
|---|---|---|---|---|
| ३ | शासकीय योजनांसाठी मेळाव्यांचे आयोजन करणे. | 1. दिव्यांगांच्या आवश्यकतेनुसार त्यांना विविध शासकीय योजनांचे लाभ मिळवून देण्यासाठी (उदा.एसटी/रेल्वे पास, आधार कार्ड, बँक खाते, विमा योजना, घरकुल इ.) तालुका स्तरावर मेळाव्यांचे आयोजन करणे.यासाठी विविध खात्याशी समन्वय साधणे.<br>2. सामाजिक सहाय योजनेचा लाभ देणेसाठी तालुका समितीची बैठक घेणे व लाभार्थींना लाभ देणे.<br>3. स्वावलंबन कार्डसाठी पात्र दिव्यांग व्यक्तींची नोंद करुन "स्वावलंबन कार्ड" उपलब्ध् करुन देणे | ऑक्टोबर व नोव्हेंबर 2018 | समाज कल्याण अधिकारी, तहसीलदार, गटविकास अधिकारी. |
| ४ | साहित्य वाटप मेळाव्यांचे आयोजन करणे. | दिव्यांगांसाठी मागणी केलेले साहित्य प्राप्त झाल्यानंतर ते वाटप करण्यासाठी मान्यवरांच्या उपस्थितीत साहित्य वाटप मेळाव्यांचे आयोजन करणे. | ३ डिसेंबर 2018 | समाज कल्याण अधिकारी, गटविकास अधिकारी. |

सदर अभियानाच्या अंमलबजावणीसाठी जिल्हा परिषद, पंचायत समिती व ग्रामपंचायतीकडील दिव्यांगांसाठी राखीव ३% निधी, लोक सहभाग, शासकीय योजना, स्वयंसेवी संस्था निधी, CSR निधी यांचा वापर करण्यात यावा.

जिल्हा परिषद कोल्हापूर मार्फत राबविण्यात येणाऱ्या या नाविन्यपूर्ण उपक्रमांतर्गत " **दिव्यांग उन्नती अभियानाच्या** " अंमलबजावणीमध्ये दिलेल्या सूचनांनुसार विहित कालमर्यादेत कार्यवाही करून सदर अभियान यशस्वी करावे. सर्व विभाग प्रमुख व गटविकास अधिकारी यांनी सदर परिपत्रक त्यांच्या अधिनस्त सर्व अधिकारी/कर्मचारी यांच्या निदर्शनास आणून कार्यवाही करावी.

शुभेच्छांसह,

(डॉ.कुणाल खेमणार)
मुख्य कार्यकारी अधिकारी,
जिल्हा परिषद, कोल्हापूर.

**सोबत- 1. परिशिष्ठ अ (दिव्यांग नोंदणी फॉर्म)**

**2. परिशिष्ठ ब (अपंगत्वाचा प्रकार ओळखण्यासाठी मार्गदर्शक सूचना)**

प्रत उचित कार्यवाहीसाठी,

१) खातेप्रमुख..............................................(सर्व) जि.प.कोल्हापूर.

२) गटविकास अधिकारी, पंचायत समिती,...........................(सर्व)

प्रत, माहितीसाठी सविनय सदर.

१) मा.विभागीय आयुक्त, पुणे विभाग पुणे.

२) मा. जिल्हाधिकारी, कोल्हापूर.